नियमीत दिवाणी दावा क्रमांक **११०**/२०१२

निशाणी ४९ वरील आदेश

१. प्रतिवादी नंबर २ ने प्रस्तुतच्या अर्जाने कैफियतीमध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मागीतली आहे.

२. प्रतिवादी नंबर २चे कथनानुसार त्याने मागीतलेल्या दुरुस्ती फॉर्मल स्वरुपाची असून दुरुस्तीमुळे कैपिफयतीच्या रचनेत कोणताही बदल होणार नाही. ती मुद्रण दोषामुळे आवश्यक आहे. ती दुरुस्ती केवळ खुलासा स्वरुपाची आहे. सबब त्याने अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

४. वादींनी निशाणी ५० कडे म्हणणे देवून अर्जास तिव्र विरोध केला आहे. वादींच्या म्हणण्यानुसार मुद्रण दोषामुळे कैफियत दुरुस्त करत आहेत या प्रतिवादीच्या कथनाबाबत त्याने कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. प्रतिवादीने दुरुस्ती मागणेस झालेल्या विलंबाचे कारणे दिलेले नाही. प्रतिवादीने विलंब करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. सबब त्याने अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

५. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तावित दुरुस्तीच्या अनुषंगे कैफियतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यामध्ये अलाहीदा प्रस्तुत प्रतिवादीने कथन केलेले आहे. त्याच्या कथनानुसार प्रस्तावित दुरुस्ती कैफियतीत केलेल्या कथनांच्या खुलाशासाठी आवश्यक आहे. त्या अनुषंगे कैफियतीचे अवलोकन केले असता अर्जातील कथन खरे असल्याचे दिसून येते. त्यामुळे कैफियतीच्या रचनेत बदल होणार नाही. प्रस्तुत प्रतिवादींनी दिनांक १८/१०/२०१४ रोजी निशाणी ३५

कडे कैफियत दिलेली आहे. दावा चौकशीसाठी प्रलंबीत आहे. अर्जातील कारण जरी खरे मानले तरी अशी दुरुस्ती प्रतिवादी यापूर्वीही मागू शकला असता. परंतु त्याने तसे केल्याचे दिसून येत नाही. याचा विचार करता दाव्याचा गुणदोषावर निर्णय होणेसाठी प्रस्तुतचा अर्ज कॉस्टवर मंजूर करणे योग्य ठरते.

७. वरील सर्व परिस्थितींचा व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करणेत येत आहे –

प्रतिवादी नं. २ ने वादींना रक्कम रुपये ३००/–
(रु. तीनशे फक्त ) कॉस्ट देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर
करणेत येतो.

सही/–

दिनांकः २८/०७/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुरुंदवाड